# अकरावी हिशोबशास्त्र विषय अध्ययनातील अडचणी व त्यावरील उपाययोजना

डॉ. मारुती ईश्वरा कुंभार




RUBY BOOK PUBLICATIONS

## लेखक परिचय




### डॉ. मारुती ईश्वरा कुंभार

एम. कॉम., एम.ए. (अर्थशास्त्र), एम. एड., एम. फिल.,
पीएच. डी., नेट, सेट, डी.एम.एम.
सहायक प्राध्यापक व कॉमर्स विभाग प्रमुख,
आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग. महाराष्ट्र


**अध्यापन अनुभव:**

- 24 वर्षे पूर्णवेळ निदेशक परचेसिंग आणि स्टोअर कीपिंग व्यावसायिक अभ्यासक्रम विभाग कणकवली कॉलेज कणकवली,
- 8 वर्षे बी.कॉम पदवी स्तर आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी.
- 3 वर्षे एम कॉम पदव्युत्तर विभाग आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी.
- 22 विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेमिनार, चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये सहभाग.
- 12 नॅशनल व इंटरनॅशनल शोधनिबंध सादरीकरण व प्रकाशन.
- मेंबर, महाविद्यालय विकास समिती(CDC) (2017-18 ते 2022-23) आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी.
- मेंबर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, (2014-15 ते 2018-19) आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी.
- मेंबर, बोर्ड ऑफ अ‍ॅकॅडमिक हेड आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी.
- सदस्य, स्थानिक चौकशी समिती (वाणिज्य विभाग) मुंबई विद्यापीठ.
- सदस्य, रिटेल मॅनेजमेंट अभ्यास मंडळ, तुळजाराम चतुरचंद स्वायत महाविद्यालय, बारामती .


For Inquiry & Order : +91 7219020447

ISBN : 978-81-951460-9-3

**RUBY BOOK PUBLICATIONS**

2213/1-2, 'C' Ward, Kalandariya Towers, Gala No.1,
Sali Galli, Somwar Peth, Kolhapur. Ph.: 0231 - 2645455
E-mail: rbpklp774@gmail.com

RUBY BOOK PUBLICATIONS

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र निष्णात (एम. एड.)
शिक्षणक्रमाच्या अंशतः पूर्तीसाठी सादर केलेल्या प्रबंधावर आधारित

# अकरावी हिशोबशास्त्र विषय अध्ययनातील अडचणी व त्यावरील उपाययोजना

संशोधक

**डॉ. मारुती ईश्वरा कुंभार**

एम. कॉम., एम.ए.(अर्थशास्त्र), एम. एड., एम. फील.,
पीएच. डी., नेट, सेट, डी. एम. एम.

**रूबी बुक पब्लिकेशन्स**

२२१३/१-२, सी वॉर्ड, कालादरिया टॉवर्स
शॉप नं. १, साळी गल्ली, सोमवार पेठ, कोल्हापूर-४१६ ००२
फोन : ०२३१-२६४५४५५, मो. ७२१९० २०४४७, ७९७२९२५२०२

© *All rights reserved*

**ISBN :** 978-81-954787-4-3

**Code No. :** TH-BK-007

**Price :** Rs. 180/-

**Edition :** First (May 2022)

***Publisher :***
**Ms. Rubina N. Mujawar**
B.C.A., M.B.A.
**Ruby Book Publications**
2213/1-2, 'C' Ward, Kalandariya Towers,
Shop No. 1, Sali Galli, Somwar Peth,
Kolhapur - 416 002 (Post Box No. 4)
Phone : (0231) 2645455, Mob. : 72190 20447, 79729 25202
E-mail : rbpklp774@gmail.com

***Type Setting & Layout :***
**Shree Samarth Graphics,** Kolhapur
Mob. : 7798511097

***Printed By :***
**Ajij Printers & Binders**
2512, 'D' Ward, Kesapur Peth,
Kolhapur - 416 002
Mob. : 9921515821

# ऋणनिर्देश

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत शिक्षणशास्त्र निष्णात (एम. एड.) या शिक्षणक्रमांतर्गत मी हा संशोधन अहवाल पूर्ण केला आहे. हे संशोधन कार्य करताना संशोधकाला विविध क्षेत्रातील व्यक्ति, शिक्षक, प्राचार्य, कुटुंबिय, हितचिंतक व मित्रमंडळी यांचेकडून सहकार्य व मदत मिळाली. त्याबद्दल मी या सर्वांचे आभार मानणे आपले कर्तव्य समजतो.

या संशोधन प्रबंधाच्या पूर्ततेसाठी संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. एस. पी. चव्हाण यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन, मदत व सहकार्य मिळाले याबद्दल मी त्यांचा शतशः आभारी आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे एम. एड. अभ्यासकेंद्र भा. अ. तथा भाईसाहेब सावंत अध्यापक महाविद्यालय, सावर्डे केंद्र संयोजक प्रा. डॉ. बी. बी. माळी, केंद्रसंचालक तथा प्राचार्य मा. एस. बी. नलावडे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मी आभार मानतो.

कणकवली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. शिंदे यांच्या प्रेरणादायी प्रोत्साहनामुळे याशिवाय महाविद्यालयातील प्रा. डॉ. एस. जी. अकोळकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. एम. डी. कांबळे यांचेही मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. कणकवली महाविद्यालयातील जे विद्यार्थी संशोधन कार्यात सहभागी झाले त्यांचेही मी आभार मानतो.

महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी शिक्षणमंत्री मा. विनोद तावडेसाहेब, तसेच सर्व संस्था पदाधिकारी, आनंदीबाई रावराणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. काकडे,

अधिक्षक श्री. संजय रावराणे व सर्व सहकारी मित्रांनी संशोधन कार्यपुस्तक रूपाने प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी सर्वांचा शतशः आभारी आहे.

संशोधन अहवाल लेखन काळात माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे प्रेरणादायी कुटुंबिय विशेषतः सुविद्य पत्नी सौ. रंजना कुंभार, मुलगी स्नेहा तसेच चि. स्वागत व अभिनंदन यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. हा संशोधन प्रबंध कमी वेळेत सुबक व अचूक टंकलिखित करून दिल्याबद्दल श्री. तेजपाल मोहरेकर तसेच ज्या ज्ञात अज्ञातांनी संशोधनासाठी हस्ते परहस्ते सहकार्य केले आहे त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

माझ्या भविष्यातील संशोधन कार्याला या सर्वांकडून असेच सहकार्य मिळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

दि.

श्री. मारुती ईश्वरा कुंभार,

संशोधक

# मनोगत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या १०+२+३ या शैक्षणिक आकृतीबंधानुसार + २ स्तरावर अथवा उच्च माध्यमिक स्तरावर वाणिज्य (Commerce) विभागातील अत्यंत महत्त्वाचा व अपरिहार्य विषय म्हणून हिशोबशास्त्र विषयाकडे पाहिले जाते. किंबहुना जगातील सर्व हिशेब या विषयाच्या मुलभूत तत्त्वांवर आधारित आहेत. त्यामुळे या विषयाच्या पद्धतशीरपणे अध्ययनाच्या अनुषंगाने काही महत्त्वाच्या बाबी आपणासमोर मांडताना मला विशेष आनंद होत आहे.

या विषयातील महत्त्वाच्या संकल्पना तसेच सर्व व्यापारी, वाणिज्यविषयक व व्यवसायातील महत्त्वाच्या व्यवहारांच्या नोंदी अचूक व अद्यावत ठेवण्यासाठी या विषयाचा सखोल अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. परंतु बऱ्याच वेळा दहावीनंतर इंग्रजी माध्यमातील हा विषय समजावून घेताना विद्यार्थ्यांना बऱ्याच अडचणी येत आहेत. त्यामुळे या अडचणी नेमक्या कोणत्या आहेत व त्या दूर करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांच्या स्तरावर कोणत्या उपाययोजना आखल्या पाहिजेत याबाबतचा ऊहापोह या पुस्तकांमध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकाशक, रुबी बुक पब्लिकेशन व श्री. तेजपाल मोहरेकर यांच्या अथक प्रयत्न व सहकार्यामुळे ही प्रथम आवृत्ती आकर्षक स्वरूपामध्ये लवकरच प्रकाशित होत आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार ! प्राध्यापक, विद्यार्थी व वाचक मित्रांकडून येणाऱ्या अभिप्राय व सूचनांचे स्वागतच केले जाईल. त्याद्वारे भविष्यात उत्तमोत्तम लिखाण करण्यास प्रेरणा मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद !

– डॉ. मारुती कुंभार

# प्रस्तावना

हिशोबशास्त्र हा वाणिज्य विभागाचा आत्मा असून वाणिज्यशास्त्राच्या उत्क्रांतीपासून हिशोबशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बदलत्या काळामध्ये हिशोब शास्त्रांमध्ये वित्तीय लेखाकर्म, परिव्यय लेखाकर्म, व्यवस्थापकीय लेखाकर्म अशी नाविन्यपूर्ण शाखा अस्तित्वात आल्या आहेत. तथापि या सर्व विद्याशाखांचे परिपूर्ण आकलन होण्यासाठी उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता अकरावी वाणिज्य या वर्गातील हिशोबशास्त्रातील मुलभूत संकल्पना संज्ञा तसेच नियम व तत्त्वांचे योग्य प्रकारे आकलन होणे अनिवार्य आहे. कारण संपूर्ण जगाचे लेखांकन या मुलभूत तत्त्वावर व नियमांवर ठीक आधारित आहे.

सध्याच्या कोरोना महामारीच्या काळामध्ये हिशोबशास्त्र विषयांमध्ये विद्यार्थ्यांची झालेली पीछेहाट तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामध्ये आलेल्या अडचणींमुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता खालावली आहे. हे विचारात घेऊन डॉ. एम. आय. कुंभार यांनी ''इयत्ता अकरावी वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना हिशोबशास्त्र विषयाच्या अध्ययनामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय योजना'' या संशोधनावर आधारित प्रकाशित केलेले हे पुस्तक अतिशय उपयुक्त असून ते विद्यार्थी व विषय शिक्षकांना मार्गदर्शक ठरणारे आहे. या पुस्तकाचा वापर इयत्ता अकरावी व बारावी वर्गाच्या हिशोबशास्त्र विषयाच्या शिक्षकांनी केल्यास निश्चितच दर्जेदार व शाश्वत अध्ययन फलश्रुती प्राप्त होईल असा मला दृढ विश्वास वाटतो. यापुढेही डॉ. एम. आय. कुंभार यांनी दर्जेदार विद्यार्थीकेंद्रित साहित्यकृती व संदर्भ ग्रंथांची निर्मिती करावी, ही सदिच्छा !

डॉ. दिपक रावेरकर,
प्राचार्य,
सुंदरराव मोरे महाविद्यालय,पोलादपूर

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| १. | संशोधन समस्येची पार्श्वभूमी | १ |
| २. | संबंधित साहित्याचा आढावा | १० |
| ३. | संशोधन कार्यपद्धती | ३१ |
| ४. | संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | ५१ |
| ५ | संशोधनाचे निष्कर्ष | ६९ |
| ६ | संशोधन समस्येवर उपाययोजना | ७१ |
| ७ | गृहितकांची यथार्थता | ७२ |
| | संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्टे | ७४ |

# प्रकरण १ संशोधन समस्येची पार्श्वभूमी

## १.१ प्रस्तावना (Introduction)

पृथ्वीची उत्पत्ती अब्जावधी वर्षापूर्वी झाल्याचे मानले जाते. पृथ्वीवर मानवाचा जन्म केव्हा, कसा व कोठे झाला तसेच जीवसृष्टी कधी व कशी निर्माण झाली ? हे एक गुढच आहे. पण मानव जातीचा इतिहास अतिप्राचीन आहे हे मात्र त्रिकाल सत्य आहे. मानवी जीवनामध्ये वाणिज्याची अथवा व्यापाराची सुरुवात केव्हा झाली याबाबत वाणिज्य अभ्यासकांमध्ये सुद्धा एकमत नाही. परंतु एक मात्र निश्चित आहे की मानवाच्या इतिहासाइतकाच वाणिज्याच्या उत्क्रांतीचा इतिहास प्राचीन आहे.

मानवाच्या शिकारी अवस्थेमध्ये शिकार केलेल्या पशुपक्षांची मोजदाद केली जात होती. त्यानंतर थोड्या प्रगत अवस्थेमध्ये मानव गटागटाने राहत होता या काळात वस्तुचे मोजमाप करण्यासाठी दगडगोटे, शंख, शिंपले, फळे इत्यादीचा वापर केला जात होता. मानवाची भटकंती कमी होऊन समुहाने ठिकठिकाणी राहुन जमीन कसण्यास सुरुवात केली. या दरम्यान एकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी वस्तू व अन्नधान्य यांची देवघेव सुरु झाली यातूनच हिशोबाला सुरूवात झाली आहे असे मानले जाते.

मानवी संस्कृती आणि वाणिज्याचा अत्यंत जवळचा संबंध आहे. मानवाच्या प्रगतीचा इतिहास म्हणजे वाणिज्याच्या प्रगतीचा इतिहास होय. मानवी संस्कृतीत झालेल्या स्थित्यंतरांचा परिणाम वाणिज्याच्या विकासावर व प्रगतीवर झाला आहे. व्यापार आणि वाणिज्याच्या क्षेत्रात मुलभूत व अनुषंगिक दीर्घकालीन आणि टिकाऊ स्वरूपाचे बदल झाले आहेत. यातील महत्त्वाचा बदल म्हणजे हिशोबशास्त्राचा वापर होय. मानवाच्या प्रगतीच्या दुसऱ्या टप्प्यावर मानव समुहाने राहू लागला व समाजप्रिय प्राणी बनला याचा परिणाम म्हणजे खेडी निर्माण झाली आणि या खेड्यामध्ये राहाणाऱ्या सर्व व्यक्ती आपल्या

| प्रकरण ७ | गृहितकांची यथार्थता |
|---|---|

## ७.१ गृहीतकांची यथार्थता :-

**कोष्टक क्रमांक ७.१**

**संशोधकाने मांडलेल्या गृहीतकांची यथार्थता**

| अ.क्र. | गृहितके | निष्कर्ष | आधार कोष्टक क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | ११ वी च्या विद्यार्थ्यांना मुलभूत संकल्पना, संबोध अवघड वाटतात. | हिशोबशास्त्र विषयाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे हे संबोध समजण्यास अवघड वाटतात. | ४.३ | स्वीकारणीय |
| २ | दिलेल्या व्यवहारांचे वर्गीकरण करतांना अडचणी येतात. | विद्यार्थ्यांना खातेनिहाय वर्गीकरण व नियमांचे आकलन झाल्यामुळे बिनचुक वर्गीकरण करतात. | ४.७ | स्वीकारणीय |
| ३ | प्रत्येक खात्याचे नियम लक्षात ठेवणे कठीण वाटते. | वर्गीकरण व नियमांचे फलक व तक्ते वर्ग खोलीत लावल्यास नियम लक्षात राहतात | ४.८ | स्वीकारणीय |
| ४ | मुलीपेक्षा मुलांचे संबोध कच्चे आहेत. | समस्यानुरुप अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये वाढ होते. | ४.६, ४.९,४.१५ | स्वीकारणीय |
| ५ | विद्यार्थी स्वतः उदाहरणांचा सराव करत नाही. | विद्यार्थ्यांचे चूकांचे प्रमाण कमी झाल्यामुळे त्यांना सरावामध्ये आवड निर्माण होते व गुणांमध्ये वाढ होते. | ४.११, ४.१३ | स्वीकारणीय |

**७.२ पुढील संशोधनासाठी विषय :-**

१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना हिशोबशास्त्र विषयाच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास व त्यावरील उपाययोजना.

२) हिशोबशास्त्र विषयाची दैनंदिन व्यवहारातील उपयुक्तता – एक चिकित्सक अभ्यास,

३) इ. १२ वी वाणिज्य हिशोबशास्त्र विषयाच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये विद्यार्थी नापास होण्याच्या कारणांचा अभ्यास व निकाल सुधारण्यासाठी उपाययोजना.

४) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इ. १२ वी वाणिज्य शाखेच्या बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाचा तौलनिक अभ्यास. (सन २००१ ते २०१०)

५) वाणिज्य शाखेच्या पदवीधरांना बँकींग क्षेत्रातील रोजगाराच्या संधीचा चिकित्सक अभ्यास – सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संस्थात्मक अभ्यास.

६) वाणिज्याच्या विकासामध्ये ग्राहकांची भूमिका एक चिकित्सक अभ्यास.

# संदर्भ ग्रंथ सुची व परिशिष्टे

**संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट्ये (इंग्रजी व मराठी)**

**अ) संदर्भ ग्रंथ सूची (इंग्रजी व मराठी)**


१) Buch M. B., Sth Survey of Research in education 1988/92 N.C.E.R.T. Delhi.

२) Patkar M. G. XI-Book-Keeping Accountancy, Phake Prakashan Kolhapur.

३) कर्डिले व्ही, महाले एस, संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन भाग-२, कुलसचिव य.च.म.मु.वि., नाशिक.

४) कायदे पाटील गंगाधर, संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक.

५) कुंभोजकर ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर,

६) कुंडले म. बा., शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

७) कुंडले, बरवे, महाले, एम. एड. संशोधन मार्गदर्शिका-भाग-२, कुलसचिव य.च.म.मु.वि., नाशिक.

८) जोशी अ. आणि महाले स., संशोधन अहवालाची लेखन पद्धती, कुलसचिव य.च.म.मु.वि., नाशिक.

९) धुरी निलम, संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर,

१०) बापट भा. गो., शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.

११) भांडारकर पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर.

१२) महाले संजीवनी, संशोधन सांख्यिकी तंत्राचे उपयोजन-प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका, कुलसचिव य.च.म.मु.वि., नाशिक.

१३) मुळे रा. आणि उमाठे, शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर.

**ब) संदर्भ हस्तपुस्तिका**

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, माध्यमिक शालांत परीक्षा निकाल सुधार मार्गदर्शक इंग्रजी.

२) महाराष्ट्र एज्युकेशन जर्नल, इयत्ता ८ वी गणित विषयातील नापासाची कारणे व उपाय, सिंधुदुर्ग जिल्हा मुख्याध्यापक संघ.

**क) शोधप्रबंध पीएच. डी.**

१) अकोळकर एस. जी., सहकारी चळवळीची ग्रामीण विकासातील भूमिका-बिद्री सहकारी कारखान्याचा संस्थात्मक अभ्यास, मुंबई विद्यापीठ. (अप्रकाशित)

२) आवळेकर जे. एल., मच्छीमार सहकारी संस्थांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (अप्रकाशित)

**ड) शोधप्रबंध एम. फिल.**

१) अकोळकर एस. जी., A Study of Worker Indebtedness in Sahyadri Glass Works Ltd. Karul, Kankavli. (अप्रकाशित)

२) माळी बी. व्ही., A Study of Financial Assistance to Educated Unemployed Under Self Employment Scheme in Kavathemahankal Taluka.

**इ) शोधप्रबंध एम. एड.**

१) पाटील एस. पी., इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाच्या अध्ययनात येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास. (अप्रकाशित)

२) तुराई टी. आर., इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे अध्ययन करतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास व त्यावरील उपाययोजना. (अप्रकाशित)